I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** माळशिरस **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0078 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/02/2026 01:10 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 17/02/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/02/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 15:45 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:10 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 24/02/2026 **Time (वेळ):** 00:40 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 24/02/2026 00:40 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, ,माळशिरस

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** श्री खंडेराव तुळशीराम रंजवे

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1981 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, पुणे, माळशिरस , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, पुणे, माळशिरस , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9923486428

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुंदरराव उत्तम नागटिळक | | | 1. घर क्र538,प्लट नं42,प्रतिभाताई,Town/Village (शहर / गाव): परिचारक नगर,Tehsil (तहसील): पंढरपुर,Police Station (पोलीस ठाणे): माळशिरस,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि. 23.02.2026.

मी श्री. खंडेराव तुळशीराम रंजवे, वय-45 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.992348642

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

आज रोजी मी समक्ष हजर राहून सरकारतर्फे फिर्याद देतो की, दि.15/02/2026 रोजी शासकीय सुट्टी असल्याने मी माझे राहते घरी असताना आमचे ला.प्र.वि. पुणे विभागाचे प्रशासन अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री दयानंद गावडे यांनी मला फोनद्वारे संपर्क करून तक्रारदार श्री. किशोर चव्हाण यांचा मोबा.क्र.92099922260 दिला व त्यांची लाच मागणीबाबत तक्रार असून त्यांना संपर्क करून ते सांगितल त्या ठिकाणी जावून त्यांची तक्रार नोंद करा व त्यावरून पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तसेच सदर कारवाईकामी सापळापथकामध्ये पोशि 1966/तावरे, मपोशि  माकर, पोशि कुमकर, शायकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक पोहवा दिवेकर असे मदतीस दिले. तसेच सदर कारवाईकामी मा. तहसिलदार, भोर कार्यालयास पत्र व्यवहार करून पंच श्री. देशभुषण चंद्रकात शेटे पद- महसुल सहाय्यक तहसील कार्यालय भोर व श्री प्रसाद चंद्रकात भाडळे पद- महसुल अधिकारी, तहसील कार्यालय भोर असे उपलब्ध करून त्यांचे मोबाईल क्रमांक मला दिले. त्यानंतर मी सापळा पथकास दि.16/02/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या व दोन्ही पंचांना पुणे - सातारा महामार्गावरील नसरापुर फाटा येथे उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दि.16/02/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता मी व सापळा पथक असे ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे पोहचून पोहवा दिवेकर यांचे ताब्यातील वर नमूद शासकीय वाहनाने सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह सुमारे 09.30 वाजता रवाना झालो. आम्ही स्वारगेट मार्गे पुणे सातारा रोडने रवाना झालो. नसरापुर येथे दोन्ही पंच साक्षीदार उपस्थित होते त्यांना शासकीय वाहनात बसवून शिरवळ - लोणंद - फलटण मार्गे कारुंडे गावचे पालखी तळाजवळ सुमारे 13.20 वाजता पोहचलो. त्यानंतर मी तक्रारदार यांना फोन केला असता तक्रारदार सदर ठिकाणी आले. त्यावेळी मी तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवून त्यांची पंच साक्षीदार व सापळा पथक यांचेशी आपसात ओळख करून दिली व तक्रारदार चव्हाण यांना त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन करण्यास सांगितली. ती आम्ही सर्वांनी ऐकली. त्यानंतर मी विचारणा केले वरून पंच साक्षीदार श्री. शेटे व भाडळे यांनी तक्रारदार चव्हाण यांचे तक्रारीवरून करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करण्यास सहमती दर्शविली. त्यानुसार पंच क्र.1 म्हणून श्री. शेटे व पंच क्र.2 म्हणून श्री भाडळे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. मी तक्रारदार व दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून केल्या जाणाऱ्या पडताळणी व सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरामध्ये दोन्ही पंचासमक्ष त्यांची सविस्तर लेखी तक्रार दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे- "तक्रारदार चव्हाण यांचे शिक्षण बी टेक सिव्हील इंजीनियरिंग झाले असुन ते सुशिक्षीत बेरोजगार इंजिनियर आहेत. त्यामुळे त्यांनी  शासकीय  ठेकदारीची  कामे मिळण्याकरिता सा.बा. विभाग  अकलुज व जिल्हा परिषद कार्यालय, सोलापुर येथे नोंदणी केली आहे. त्याचप्रमाणे ते मजुर सहकरी संस्थाना मिळालेल्या शासकीय ठेकेदारी कामामध्ये पोट ठेकेदार म्हणुन देखील काम करतात. त्यानुसार मे लक्ष्मी मजुर सहकारी संस्था मर्या मारकडवाडी ता माळशिरस जि सोलापुर या संस्थेस मौजे धर्मपुरी गावातील राजेंद्र रणदिवे यांच्या घरा शेजारील गावठाण जागेत महालक्ष्मी मंदीरासमोर सभा मंडप बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग अकलुज कार्यालयकडुन मिळाले व दि. 09/01/2025 रोजी त्याचा कार्यारंभ आदेश मिळाला.

त्यानंतर दि.10/01/2025 लक्ष्मी मजुर संस्थेने सदरचे काम सब कॉन्ट्रक्टर म्हणुन तक्रारदार यांना करार करून दिले. तक्रारदार यांनी दि. 30/12/2025 पर्यंत सदर काम पुर्ण केले व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, सोलापुर येथे लक्ष्मी मजुर संस्थेच्या नावे असलेले कामाचे रु.9,74,571/- रकमेचे बिल जमा केले. त्यानंतर समाज कल्याण कार्यालयाने सदर काम पुर्ण केलेबाबत पुर्णत्त्वाचा दाखला/अहवाल मिळण्यासाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय माळशिरस येथे मेल केला. परंतु पंचायत समिती कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद न मिळल्याने तक्रारदार यांनी सदर पत्र बाय हॅन्ड घेवून पंचायत समिती कार्यालयातील संबंधीत लिपीक श्री नागटिळक यांचेकडे दि. 13/02/2026 रोजी जमा केले. त्यावेळी लिपीक नागटिळक यांनी तक्रारदार यांनी पुर्ण केलेल्या कामाचा पुर्णत्वाचा दाखला देणेसाठी बी.डी ओ श्री रघुनाथ पांढरे साहेबाना 10,000/- दयावे लागतील असे सांगितले व सदरची रक्कम दि. 16/02/2026 रोजी घेवून बोलविले होते.

लोकसेवक नागटिळक यांनी मागणी केलेली रक्कम रु. 10,000/- ही कोणतीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असून ती तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार चव्हाण यांनी लिपिक नागटिळक व बी.डी.ओ. पांढरे यांच्याविरुध्द कायेदशीर कारवाई होणेकरीता मा.पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे नावे वरिलप्रमाणे लेखी तक्रार दिली." याप्रमाणे तक्रार दिल्यानंतर ती दोन्ही पंचांनी व मी वाचून आम्ही त्यावर सहया केल्या. त्यानंतर लोकसेवक लिपिक नागटिळक व बीडीओ पांढरे हे तक्रारदार चव्हाण यांचेकडे लाच मागतात अगर कसे? याबाबत तक्रारदार यांना पंच क्र.1 शेटे यांचेसोबत पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे पाठवून पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याअनुशंगाने मी शासकीय व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिती देवून त्यामध्ये 32 जीबी क्षमतेचे sandisk 32GB micro SD HCI C4 3386DRJENOVP BM MADE IN CHINA वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड घातले तक्रारदार, पंच क्र.1 व पंच क्र.2 यांची पडताळणी निवेदने 15.33 वाजता ध्वनिमुद्रीत केली. त्यावेळी सदर निवेदनाचे मपोशि माकर यांचेकडील मोबाईलमध्ये व्हीडीओ चित्रिकरण करण्यात आले. त्यानंतर मी उपस्थित सर्वांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक सर्व सुचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो तक्रारदार चव्हाण यांचेकडे दिला व त्यांना पंच क्र.1 शेटे यांचेसोबत त्यांचे दुचाकी वाहन होन्डा युनिकॉर्न एमएच 45 एजी 8675 ने पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे सुमारे 15.45 वाजता रवाना केले. तक्रारदार व पंच क्र.1 असे पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे पोहचून लोकसेवक लिपीक नागटिळक यांना भेटले. त्यावेळी तक्रारदार यांनी काम पुर्णत्वाचे दाखल्याबाबत विचारणा केली असता, लोकसेवक नागटिळक यांनी बीडीओ साहेब आमदारांचे मिटींग करीता माढा येथे गेले असल्याने उदया दि.17/02/2026 रोजी या असे तक्रारदार यांना सांगितले. त्यामुळे तक्रारदार व पंच क्र.1 असे सुमारे 17.34 वाजता परत आले. मी सर्वांना आवश्यक त्या सुचना देवून दि.16/02/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दि.17/02/2026 रोजी सुमारे 11.35 वाजता मी पंच साक्षीदार व सापळा पथकासह तक्रारदार चव्हाण यांना पुणे पंढरपुर रोडवरील फडतरी फाटयावरील पुलाखाली पुढील पडताळणी कारवाईकरीता भेटलो. त्यानंतर तक्रारदार, पंच क्र.1 व पंच क्र.2 यांची शासकीय वाहनामध्ये 11.46 वाजता पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यावेळी सदर निवेदनाचे मपोशि माकर यांचेकडील

मोबाईलमध्ये व्हीडीओ चित्रिकरण करण्यात आले. त्यानंतर मी उपस्थित सर्वांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक सुचनांची उजळणी करून दिली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो तक्रारदार चव्हाण यांचेकडे दिला व त्यांना पंच क्र.1 शेटे यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी वाहन होन्डा युनिकॉर्न एमएच 45 एजी 8675 ने पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे सुमारे 11.56 वाजता रवाना केले. तक्रारदार व पंच क्र.1 असे पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे पोहचले. लोकसेवक नागटिळक त्यांचे जागी उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचा मोबा.क्र.9209992260 वरून लोकसेवक नागटिळक यांचे 9834983785 या मोबाईल क्रमांकावर साध्या फोन कॉलद्वारे स्पीकर मोडवर संपर्क करून सदर ठिकाणी आल्याची माहिती दिली. त्यानंतर थोडयाच वेळात लोकसेवक नागटिळक त्यांचे टेबल जवळ आले.

त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक नागटिळक यांचेत तक्रारदार यांचे कामासंदर्भाने चर्चा झाली. त्या दरम्यान तक्रारदार लोकसेवक नागटिळक यांना "साहेबच जी पेमेंट आहे" असे बोलले असता नागटिळक यानी "हं" असे बोलुन त्यास संमती दर्शवली. त्यावर तक्रारदार त्यांना "ती किती दयायच" असे विचारले असता लोकसेवक नागटिळक यांनी पंचासमक्ष त्याच्या उजव्या हाताची पाच ही बोटे वरकरुन तक्रारदार यांना इशारा केला. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "किती" असे विचारले असता लोकसेवक नागटिळक यांनी "पाच" असे हळु आवाजात सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "पाच का दहा" असे पुन्हा विचारले त्यावर नागटिळक यांनी "पाच" असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी तडजोडीकरीता "पाच का थोडस कमी जास्त झाल तर बघा की" अशी लोकसेवक नागटिळक यांना विनंती केली असता लोकसेवक नागटिळक यांनी "अरं मला ती मला 1 टक्का म्हणत होते....ही काटण्याच्या नादाला लागुन जिकडं तिकडं केल्यातय" असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्याना "दवाखान्याला पैसे गेल्यातय म्हणुन म्हणल साहेबाना काही तरी पर्याय रिक्वेस्ट केली असती ... काय कमी केल असत तर" असे तडजोडी करिता बोलले असता लोकसेवक नागटिळक यांनी "ती आपल्या आपल्यात चालतय" अस बोलुन साहेबाकडे तडजोड चालत नाही असे तक्रारदार यांना सांगुन लोकसेवक नागटिळक यांनी बी डी ओ पांढरे साहेबकरिता तक्रारदार यांचेकडे रु.5,000/- लाचेची मागणी केली.

त्यानंतर लोकसेवक नागटिळक यांनी मागणी केलेली रुपये पाच हजार ही रक्कम कमी करण्याकरीता बी डी ओ पांढरे साहेबांना भेटतो तुम्ही माझ्या सोबत चला, असे तक्रारदार लोकसेवक नागटिळक यांना बोलले असता नागटिळक यांनी तक्रारदार यांना तुम्ही एकटे जावून भेटा असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार हे बी.डी.ओ. पांढरे यांना त्यांचे केबिनमध्ये पंच क्र.1 शेटे यांचेसह जावून भेटले. त्यावेळी तक्रारदार यांनी "धर्मापुरीच्या सभा मंडपाच्या केलेल्या कामाच्या बीला संदर्भात बोलायच होत त्याला पाहणी अहवाल लागतोय .पाहणी अहवाल नागटिळक साहेबांनी तुमच्यापशी दिलय" असे बी डी ओ श्री पांढरे यांना बोलले असता त्यावर बीडीओ श्री पांढरे यांनी "बाहेर भेटा नागटिळकला भेटा तिकड ...विस्तार अधिकारी बघतात मी नाही बघत" असे तक्रारदार यांना सांगुन जाण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार पंच क्र.1 सह लोकसेवक नागटिळक यांना भेटले व त्यांनी बीडीओ भेटीची हकिकत नागटिळक यांना सांगितली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे 14.08 वाजता आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मी तक्रारदार व पंच क्र.1 यांना घडलेली हकिकत

विचारली व ती ऐकुन व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकून खात्री केली. एंकदरीत तक्रारदार यांनी मे.लक्ष्मी मजुर संस्थेसच्या वतीने सब कॉन्ट्रक्टर म्हणून धर्मापुरी गावामध्ये बांधकाम केलेल्या संभामंडप कामाचा पुर्णत्वाचा दाखला/अहवाल देण्यासाठी लोकसेवक लिपीक नागटिळक यांनी बीडीओ श्री. पांढरे यांच्याकरिता रु.5,000/- लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचेकडील दुचाकीने लाच रकमेसह पंच क्र.1 श्री शेटे यांचेसोबत लोकसेवक नागटिळक यांना भेटण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे पाठवून सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मी तक्रारदार व पंचांना शासकीय बसविले व तक्रारदार यांना लाचेच्या रकमेबाबत विचारणा केलेवरून तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे बचतीमधील रु.500/-दराच्या एकुण 10 नोटा अशी रु.5,000/- लाच रक्कम म्हणून पंचासमक्ष माझे समोर हजर केल्या.

=======================

त्यांचे नंबर पोशि कुमकर यांनी एका कोऱ्या कागदावर पंच क्र.2 यांचे मदतीने लिहून घेतले. मी दिलेल्या सुचनेवरून पोहवा दिवेकर यांनी तक्रारदार व पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रासिन पावडर नेहमीच्या प्रकाशात पाहीली असता तिचेवर कोणतीही चकाकी दिसुन येत नाही परंतु तीचेवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता निळसर चकाकी दिसुन येते. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रकमेच्या नोटांना पोहवा दिवेकर यांनी अँथ्रासिन पावडर लावून कृत्रिम अंधार व उजेड करून प्रात्यक्षिके करून दाखविली. पोहवा दिवेकर यांनी अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टचे समोरील डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी तक्रारदार यांना त्यांनी परिधान केलेला चष्मा डाव्या हाताने काढुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर मी तक्रारदार, पंच क्र.1 व पंच क्र.2 यांची सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा निवेदने 16.24 वाजता व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केली व उपस्थित सर्वांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुमारे 16.37 वाजता चालू करून तो तक्रारदार यांचेकडे दिला व तक्रारदार व पंच क्र.1 असे तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहन होन्डा युनिकॉर्न एमएच 45 एजी 8675 ने पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे रवाना केले. लागलीच मी, सापळा पथक असे पंच क्र.2 यांचे सह शासकीय वाहन एमएच 12 युसी 4109 ने रवाना होवून पंचायत समिती कार्यालय माळशिरस येथे पोहचून सदर कार्यालयाचे तळमजल्याचे बीडीओ कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबलो.

त्यावेळी तक्रारदार व पंच क्र.1 श्री शेटे असे पंचायत समिती कार्यालयाचे तळमजल्यावरील मुख्य दरवाज्यातुन आत आले व लोकसेवक नागटिळक बसत असलेल्या टेबल जवळ गेले असता त्या ठिकाणी लोकांची गर्दी होती. त्यावेळी लोकसेवक नागटिळक यांनी तक्रारदार यांना तुमचे पेपर सहीला ठेवल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी बीडीओ साहेबांना भेटण्याकरीता जावू का असे नागटिळक यांना विचारले असता त्यांनी सही झालेली नाही साहेबांना भेटा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे बीडीओ श्री पांढरे यांना त्यांचे कक्षामध्ये जावून भेटलो. त्यावेळी तक्रारदार यांनी बीडीओ श्री पांढरे यांना धर्मापुरीच पॅड होत, झाली का त्यावर सही असे विचारले असता बीडीओ श्री

पांढरे यांनी कुठल अशी विचारणा केली त्यावर तक्रारदार यांनी संभा मंडपाच होत असे सांगितले त्यावर बीडीओ श्री. पांढरे यांनी काही तक्रार ये का अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी नाही काही तक्रार मगाशी भेटलो ना नागटिळक साहेबांना, सगळ करतो त्यांच्याकड असे सांगितले. त्यावेळी बीडीओ श्री पांढरे यांनी पंच क्र.1 शेटे यांचेबाबत तक्रारदार यांचेकडे विचारणा करून पंच क्र.1 शेटे यांना बाहेर थांबण्यास सांगितले. त्यामुळे पंच क्र.1 शेटे बीडीओ यांचे केबिनचे बाहेर थांबले. त्यानंतर बीडीओ श्री पांढरे यांनी एका महिला कर्मच्याऱ्याच्या मार्फतीने लोकसेवक नागटिळक यांना त्यांचे केबिनमध्ये बोलावून घेतले व त्यानंतर तक्रारदार यांना देखील केबीनचे बाहेर थांबवले. त्यानंतर लोकसेवक नागटिळक व बीडीओ श्री पांढरे यांचेत बंद केबिनमध्ये चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक नागटिळक बाहेर आले. तक्रारदार व पंच क्र.1 असे नागटिळक यांचे पाठोपाठ त्यांचे टेबलाजवळ गेले. त्यावेळी लोकसेवक नागटिळक यांनी तक्रारदार यांचे पाहणी अहवालावर विस्तार अधिकारी कदम यांची सही झालेली नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी आणखी थोडी चर्चा करून बीडीओ साहेबांच नक्की म्हणणे काय आहे अशी नागटिळक यांना विचारणा केली असता लोकसेवक नागटिळक यांनी विस्तार अधिकारी कदम यांचा मोबा.क्र. 9763353095 हा तक्रारदार यांना देवून त्यांना फोन करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांचे मोबा.क्र.9209992260 वरून विस्तार अधिकारी कदम यांना फोन लावून स्थळ पाहणी बाबत विचारणा केली असता विस्तार अधिकारी कदम यांनी ते ट्रेनिंग करीता सोलापुर येथे असून आल्यानंतर बघु असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी बाहेर येवून लोकसेवक नागटिळक यांना फोन केला पेमेंट देवून जावू का असे विचारले असता लोकसेवक नागटिळक यांनी सही नाही कशाला घ्यायचे रे म्हणून लाच रक्कम स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे तक्रारदार व पंच क्र.1 असे लाच रक्कम स्वीकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा न करता परत निघुल आले. त्यामुळे विस्तार अधिकारी कदम यांची सही झाल्यानंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून दि.17/02/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर आज दि.20/02/2026 रोजी तक्रारदार चव्हाण यांनी त्यांचे काम पुर्णत्व अहवालावर विस्तार अधिकारी यांची सही झाल्याची माहिती दिली. परंतु दि.21 व 22 रोजी सुट्टी असल्याने दि.23/02/2026 रोजी लोकसेवक नागटिळक यांचेविरुध्द सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार मी दिलेल्या सुचनेवरून सापळा पथक व पंच साक्षीदार असे ला.प्र.वि. पुणे कार्यालयात आज दि.23/02/2026 रोजी सकाळी 08.15 वाजता हजर झाले. त्यामध्ये पंच क्र.2 श्री भाडळे यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांचे ऐवजी श्री. सुनिल तानाजी डवरी पद- ग्राम महसुल अधिकारी यांना त्यांचे कार्यालयाकडून पाठविण्यात आले. त्यानंतर आम्ही सर्वजण सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह पोहवा दिवेकर यांचे ताब्यातील शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 ने ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन सुमार 08.44 वाजता रवाना होवून सासवड-जेजुरी-लोणंद- फलटण- नातेपुते मार्गे कारुंडे गावचे पालखी तळाजवळ सुमारे 11.47 वाजता पोहचलो. तक्रारदार यांना पुर्वकल्पना दिल्याने तक्रारदार सदर ठिकाणी त्यांचेकडील दुचाकी वाहन होन्डा युनिकॉर्न क्र. एमएच 45 एजी 8675 सह सदर ठिकाणी हजर होते. पंच श्री डवरी हे नवीन असल्याने मी त्यांची ओळख तक्रारदार व सापळा पथकाशी करून दिली. तसेच आलोसे नागटिळक

यांना पंच क्र.1 श्री शेटे यांचा संशय आल्याने त्यांचे जागी पंच क्र.1 म्हणून पंच श्री डवरी यांना सापळा कारवाईकरीता तक्रारदार यांचेसोबत पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्यानुसार मी तक्रारदार, पंच डवरी व पंच शेटे यांची सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा निवेदने 12.45 वाजता व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केली. तसेच त्याचे मपोशि माकर यांचे मोबाईलमध्ये व्हीडीओ रेकॉर्डींग केले. त्यानंतर दि.17/02/2026 रोजीचे सापळा स्थगित कारवाई दरम्यान अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रु.5000/- (500रु.दराच्या एकुण 10 नोटा) माझे सुचनेवरून पोहवा दिवेकर यांनी तक्रारदार यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवली. तसेच नोट नंबर लिहलेला कागद पंच क्र.2 शेटे यांचेकडे सुपूर्द केला. त्यानंतर मी उपस्थित सर्वांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुमारे 12.57 वाजता चालू करून तो तक्रारदार यांचेकडे दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री डवरी असे तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहन होन्डा युनिकॉर्न एमएच  45 एजी 8675 ने पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे सापळा कारवाईसाठी रवाना केले. लागलीच मी, सापळा पथक असे पंच क्र.2 यांचे सह शासकीय वाहन एमएच 12 युसी 4109 ने रवाना होवून पंचायत समिती कार्यालय माळशिरस येथे पोहचून सदर कार्यालयाचे तळमजल्याचे बीडीओ कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबलो.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 डवरी असे पंचायत समिती कार्यालयात आले. लोकसेवक नागटिळक बसत असलेल्या टेबलजवळ गेले. नागटिळक यांचेसमोर लोक होते. तक्रारदार यांनी थोडा वेळ वाट पाहिली व त्यांना कदम साहेबांचा फोन आला होता त्यांनी काम पुर्णत्व अहवालावर सही केली असल्याची माहिती लोकसेवक नागटिळक यांना दिली. त्यानंतर लोकसेवक नागटिळक व तक्रारदार यांचेत थोडी चर्चा होवून लोकसेवक नागटिळक यांनी जेवणानंतर पाहू असे तक्रारदार यांना बोलून ते जेवायला गेले. जेवणकरून परत आल्यानंतर पुन्हा त्यांचेसमोर लोकांची गर्दी असल्याने तक्रारदार यांनी पुन्हा वाट पाहीली. गर्दी कमी झाल्यानंतर लोकसेवक नागटिळक यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष लाच रकमेबाबत उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून इशारा केला व ते बसत असलेल्या टेबलचे उजव्या बाजुचा वरिल ड्रॉव्हर उघडून त्यामध्ये लाचेची रक्कम ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे शर्टचे डाव्याबाजुचे खिशामध्ये अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून ती नागटिळक यांनी सांगितल्याप्रमाणे ड्रॉव्हरमध्ये असलेल्या कागदपत्रांवर ठेवली. त्यावेळी तक्रारदार यांनी पाच हजार रुपये हायत आ असे लोकसेवक नागटिळक यांना बोलले असता त्यावर नागटिळक यांनी हंम्म असे बोलून सहमती दर्शिवीली. त्यानंतर पंच डवरे हे सदर ठिकाणी थांबून राहिले व तक्रारदार यांनी बाहेर येवून सापळा पथकास त्यांनी परिधान केलेला चष्मा डाव्या हाताने काढून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 15.10 वाजताची होती. त्यानंतर मी, पंच क्र.2 शेटे व सापळा पथकासह जावून माझी व सापळा पथकाची ओळख करून देवून लोकसेवक नागटिळक यांचेकडून लाच रक्कम हस्तगत केली. त्यावेळी मी लोकसेवक नागटिळक यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुंदरराव उत्तम नागटिळक वय 56 वर्षे, पद- वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कार्यालय माळशिरस जि. सोलापुर रा. घर क्र.538, प्लॉट नं.42, प्रतिभाताई परिचारक नगर, टाकळीरोड, पंढरपुर जि.

सोलापुर वर्ग-3 असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक नागटिळक यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेतले. सदरबाबत दि.16/02/2026, दि.17/02/2026 व आज दि.23/02/2026 रोजी सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामे करण्यात आलेले आहेत.

तरी दि.17/02/2026 रोजीचे 15.45 ते 17.34 वाजताचे दरम्यान पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यातील आलोसे श्री. सुंदरराव उत्तम नागटिळक वय 56 वर्षे, पद- वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कार्यालय माळशिरस जि. सोलापुर रा. घर क्र.538, प्लॉट नं.42, प्रतिभाताई परिचारक नगर, टाकळीरोड, पंढरपुर जि. सोलापुर यांनी यातील तक्रारदार श्री. किशोर सुर्यकांत चव्हाण वय 30 वर्षे व्यवसाय- सुशिक्षित बेरोजगार इंजिनिअर/शासकीय ठेकेदार रा. मु.पो. गुरसाळे ता. माळशिरस जि. सोलापुर यांना त्यांनी सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून मोैजे धर्मपुरी गावामध्ये बांधकाम केलेल्या संभामंडप कामाचा काम पुर्णत्वाचा दाखला/अहवाल देण्यासाठी बी.डी.ओ. श्री पांढरे यांचेकरीता व स्वतःकरीता रु.5,000/- लाचेची मागणी पंचासमक्ष करून ती आज दि.23/02/2026 रोजीचे सापळा कारवाई दरम्यान सुमारे 12.57 ते 15.10 वाजता दरम्यान पंचायत समिती कार्यालय, माळशिरस येथे पंचासमक्ष बी.डी.ओ. श्री. पांढरे यांचेकरीता व स्वतःकरीता स्वीकारली म्हणून माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ अन्वये कायदेशिर फिर्याद आहे.
माझा वरिलप्रमाणे संगणकावर मराठीत टंकिलिखीत केलेला जबाब माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला…

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vikas channvir dindure (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vikas channvir dindure

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DGPVCDM7901

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**